# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 29.01.2026** **वार- गुरुवार**

---

**अंत्यसंस्कार**

हजारोंच्या संख्येनं जमलेला जनसमुदाय, त्यांचे पाणावलेले डोळे आणि अजितदादा अमर रहे, अशा भावपूर्ण घोषणा अशा अत्यंत शोकाकुल वातावरणात उपमुख्यमंत्री अजित पवार यांना आज शासकीय इतमामात अखेरचा निरोप देण्यात आला. बारामती इथल्या विद्या प्रतिष्ठानच्या परिसरात त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांचे दोन्ही पुत्र पार्थ आणि जय पवार यांनी त्यांना मुखाग्नी दिला. यावेळी बंदुकीच्या फैरी झाडून त्यांना सलामी देण्यात आली. तत्पूर्वी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी, गोव्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत, राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पुष्पचक्र अर्पण करून अजित पवार यांना श्रद्धांजली वाहिली. केंद्रीय राज्य मंत्री रामदास आठवले, रक्षा खडसे आणि मुरलीधर मोहोळ यांच्यासह राज्याच्या मंत्रिमंडळातील मंत्री, भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नबीन, मनसे अध्यक्ष राज ठाकरे, काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, यांच्यासह विविध पक्षांचे नेते, जेष्ठ नेते शरद पवार, खासदार सुप्रिया सुळे आणि सुनेत्रा पवार यांच्यासह पवार कुटुंबातील सर्व सदस्य अजितदादांना अखेरचा निरोप देण्यासाठी उपस्थित होते. त्यांच्या सन्मानार्थ राज्य सरकारनं 3 दिवसांचा दुखवटा जाहीर केला आहे.

अजित पवार यांच्या निधनानं संपूर्ण राज्यावर शोककळा पसरली आहे.
त्यांना श्रध्दांजली अर्पण करण्यासाठी आज पुणे आणि पिंपरी चिंचवड शहरात बंद पाळण्यात आला. अनेक दुकानं, व्यापारी आस्थापना आज बंद ठेवण्यात आली.

**ब्लॅकबॉक्स**

राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार आणि अन्य चार जणांच्या मृत्यूला कारणीभूत ठरलेल्या अपघातग्रस्त विमानाचा ब्लॅक बॉक्स अपघातस्थळावरून ताब्यात घेण्यात आला आहे. नागरी विमान वाहतूक मंत्रालयानं ही माहिती दिली आहे. या प्रकरणाचा तपास सखोल आणि पारदर्शकपणे करण्याला आणि तो निश्चित काळात पूर्ण करण्याला सर्वोच्च प्राधान्य असल्याचं मंत्रालयानं म्हटलं आहे.

**एअर ट्रॅफिक यंत्रणा**

बारामतीत झालेल्या विमान अपघाताच्या पार्श्वभूमीवर राज्य शासनाने केलेल्या विनंतीवरून भारतीय हवाई दलाच्या लोहगाव इथल्या तंत्रज्ञानी बारामती विमानतळावर एअर ट्रॅफिक यंत्रणा बसवली आहे. बारामती विमानतळावरील हवाई वाहतूक सुरळीत होण्याच्या दृष्टीने ही यंत्रणा महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचं हवाई दलाच्या अधिकाऱ्यांनी सांगितलं.

**गांधीपुण्यतिथी**

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या पुण्यतिथी निमित्त उद्या पुणे आणि परिसरात विविध संस्था संघटनांच्या वतीनं त्यांना आदरांजली अर्पण करण्यात येणार आहे. कोथरूडच्या गांधी भवन इथं उद्या सकाळी सर्वधर्म प्रार्थनेचं आयोजन केलं आहे.

**पुणेमनपा**

पुणे महापालिकेच्या निवडणुकीत पाचशे चौरस फुटापर्यंतच्या घरांना मिळकत कर माफ करण्याचं आश्वासन सर्वच राजकीय पक्षांनी जाहीरनाम्यात दिलं होतं. पुण्यात 12 लाख 69 हजार 163 निवासी मिळकती आहेत. त्यात 4 लाख 29 हजार 245 मिळकती या 500 चौरस फुटापर्यंतच्या आहेत. या मिळकतींचा कर माफ केल्यास पालिकेचं उत्पन्न 255 कोटी रुपयांनी कमी होणार आहे.

**Pcmc**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या इंद्रायणी नगर इथल्या शाळेतील; लावण्या लोहारे या विद्यार्थिनीने काळा घोडा ऑनलाइन कला स्पर्धेअंतर्गत घेण्यात आलेल्या कॉमिक्स चॅलेंज या प्रकारात उत्तेजनार्थ पारितोषिक पटकावलं आहे. राष्ट्रीय स्तरावर या स्पर्धेचं आयोजन करण्यात आलं होतं.

**कार्यशाळा**

यशस्वी संस्थेनं नुकतीच संशोधन पद्धती विषयक कार्यशाळा आयोजित केली होती. दोन दिवसांच्या या कार्यशाळेत "प्रबंध लेखनासह डेटा विश्लेषण साधनांचे एकत्रीकरण" या विषयावर मान्यवरांनी मार्गदर्शन केलं. संशोधन करताना सांख्यिकीय विश्लेषणाचे महत्त्व लक्षात घेऊन संशोधन प्रवासात कठोर आणि नैतिक दृष्टिकोनांचं पालन करणं आवश्यक आहे, असं मत संस्थेचे संचालक डॉ.शिवाजी मुंढे यांनी केलं.

**क्रीडा**

वेस्टर्न इंडिया रिझनल कौन्सीलच्या पुणे शाखेतर्फे 13व्या ‘व्हिएसएन सीए क्रिकेट लीग स्पर्धा सुरू आहेत. स्पर्धेची अंतिम फेरी आज पार पडली.

आकाश कोयले याने केलेल्या अष्टपैलु खेळीच्या मदतीने व्हिएसएन सुपरकिंग्ज् संघाने गतविजेत्या बीस्मार्ट संघाचा 23 धावांनी सहज पराभव करून स्पर्धेचे विजेतेपद मिळवलं. आनंद दायमा स्पर्धेतील सर्वोत्कृष्ट खेळाडू ठरला. प्रवीण नलावडे; उत्कृष्ट गोलंदाज आणि किरण गारगोटे हे उत्कृष्ट क्षेत्ररक्षक ठरले.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज किमान तापमान 15 पूर्णांक 1 दशांश अंश; तर कमाल तापमान 30 अंश सेल्सियस नोंदवलं गेलं. उद्याही तापमान साधारण असंच राहील, तसंच दुपारनंतर आकाश अंशत: ढगाळ राहण्याचा पुणे वेधशाळेचा अंदाज आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**